28 NOV 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातर्फे पुस्तकांच्या गावाला ५१७ ग्रंथ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशातील वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने भिलारसारखी पुस्तकांची गावे जिल्ह्या-जिल्ह्यांत निर्माण व्हायला हवीत, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी भिलार (जि. सातारा) येथे व्यक्त केली.

देशातील पहिले पुस्तकांचे गाव म्हणून राज्य शासनाने विकसित केलेल्या भिलारला शिवाजी विद्यापीठाच्या वतीने नुकतीच ५१७ पुस्तके प्रदान करण्यात आली. सातारा जिल्हा ग्रंथालय संघाचे ४५ वे अधिवेशन, मातृ-पितृ पुरस्कार वितरण आणि स्वातंत्र्यसैनिक देशभक्त भि.दा. भिलारे गुरुजी यांची ९८ वी जयंती अशा संयुक्त कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. शिंदे होते. या कार्यक्रमात विद्यापीठाच्या वतीने हा पुस्तक प्रदान सोहळा पार पडला. राज्य ग्रंथालय संचालक किरण धांडोरे यांनी भिलारच्या वतीने कुलगुरू शिंदे यांच्या हस्ते ग्रंथभेट स्वीकारली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे भिलार गावाला ५१७ ग्रंथांची भेट राज्य ग्रंथालय संचालक किरण धांडोरे यांच्याकडे देताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.**

ज्येष्ठ साहित्यिक प्रा. द.ता. भोसले, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संभाजीराव पाटणे, उद्योजक सारंग पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्राचार्य डॉ. डी.आर. मोरे, प्राचार्य डॉ. आर.एस. पाटील, प्राचार्य डॉ. दिलीप कुरळपकर, प्राचार्य डॉ. बी.एस. सावंत आदी उपस्थित होते.

यासह स्वतः अल्पशिक्षित असूनही आपल्या मुलाला मोठ्या संघर्षातून जिद्दीने शिकवून कुलगुरूपदापर्यंत पोहोचविणाऱ्या श्रीमती नागरबाई शिंदे यांचा या कार्यक्रमात संभाजीराव पाटणे यांच्या हस्ते मातृ-पितृ पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात आला. यावेळी शिंदे कुटुंबीय उपस्थित होते.

28 NOV 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातर्फे पुस्तकाच्या गावाला ५१७ ग्रंथांची भेट

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशातील पहिले पुस्तकांचे गाव म्हणून महाराष्ट्र शासनाने विकसित केलेल्या भिलार गावाला शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ५१७ ग्रंथ प्रदान करण्यात आले. सातारा जिल्हा ग्रंथालय संघाचे ४५ वे अधिवेशन, मातृ-पितृ पुरस्कार वितरण आणि स्वातंत्र्यसैनिक देशभक्त भि. दा. भिलारे गुरूजी यांची ९८वी जयंती अशा संयुक्त कार्यक्रमावेळी ही ग्रंथ भेट विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली. महाराष्ट्र राज्याचे ग्रंथालय संचालक किरण धांडोरे यांनी कुलगुरूंच्या हस्ते ग्रंथभेट स्वीकारली.

यावेळी कुलगुरु डॉ. शिंदे यांनी देशातील वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने भिलारसारखी पुस्तकांची गावे प्रत्येक जिल्ह्यात निर्माण व्हायला हवीत, अशी अपेक्षा व्यक्त केली. यानंतर त्यांनी भिलार गावात फिरून तेथील ग्रंथसंग्रहाची पाहणी केली. प्रकल्प समन्वयक धर्माधिकारी यांनी या प्रकल्पातंर्गत १५ हजार पुस्तके असून अनेक घरे वाचकांच्या स्वागतासाठी रात्रंदिवस खुली असतात, अशी माहिती दिली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे भिलार गावाला देण्यात आलेले ५१७ ग्रंथ कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते स्वीकारताना ग्रंथालय संचालक किरण धांडोरे. सोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, नागरबाई शिंदे डॉ. डी. आर मोरे आदी.

यावर डॉ. शिंदे यांनी पुस्तकांचे गाव हा प्रकल्प स्तुत्य व ऐतिहासिक स्वरुपाचा असल्याचे सांगितले. विद्यापीठातर्फे सध्या प्रातिनिधिक स्वरुपात ५१७ पुस्तकांची देणगी देत असून या पुढील काळातही या उपक्रमासाठी सर्वोतोपरी सहकार्य करील, अशी ग्वाही त्यांनी दिली. या पुस्तकांमध्ये विद्यापीठातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या पुस्तकांबरोबरच विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, प्राचार्य यांनीही काही पुस्तके भेट स्वरुपात दिली आहेत. यावेळी उद्योजक सारंग पाटील, ज्येष्ठ साहित्यिक प्रा.द.ता. भोसले, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संभाजीराव पाटणे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी.के. गायकवाड, डॉ. व्ही.एन. शिंदे, प्राचार्य डॉ. डी.आर. मोरे, प्राचार्य डॉ. आर.एस. पाटील, प्राचार्य डॉ. दिलीप कुरळपकर, प्राचार्य डॉ. बी.एस. सावंत आदी उपस्थित होते.

## नागरबाई शिंदे यांचा 'मातृ-पितृ' पुरस्काराने गौरव

स्वतः अल्पशिक्षित असूनही आपल्या मुलाला कुलगुरू पदापर्यंत पोहोचविणाऱ्या नागरबाई शिंदे यांचा 'मातृ-पितृ पुरस्कार' प्रदान करून गौरव करण्यात आला. संभाजीराव पाटणे यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी कुलगुरू डॉ. शिंदे आपल्या कुटुंबीयांसह उपस्थित होते.

28 NOV 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संविधानाचा नियमित अभ्यासक्रमात समावेश आवश्यक

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

संविधानाविषयी नागरिकांत जागृती करण्याची गरज असून संविधानाचा नियमित अभ्यासक्रमात समावेश करणे आवश्यक आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठातील परिसंवादात व्यक्त झाला. भारतीय संविधान दिनानिमित्त विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने 'भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. परिसंवादात डॉ. रविनंद होवाळ (सोलापूर), प्रा. सुभाष दगडे (सांगली) आणि डॉ. राजेंद्र कुंभार (सातारा) यांनी सहभाग घेतला. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. कुंभार यांनी बाबासाहेबांच्या 'क्रांतीचे चक्र अर्धेच फिरले आहे', या विधानाचा संदर्भ दिला आणि म्हणाले की, भारताचा हा अर्धा प्रवास 'एक व्यक्ती, एक मत' इतकाच झाला आहे. अद्याप 'एक मत, एक मूल्य' हा प्रवास पूर्ण करून क्रांतीच्या चक्रास पूर्णत्व प्रदान करावयाचे आहे. महात्मा फुले, एम. एन. रॉय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सत्य हे मूल्य मानणाऱ्या विचारसरणीचा अभ्यासात समावेश आवश्यक आहे.



**कोल्हापूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना डॉ. एस. एस. महाजन, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. राजेंद्र कुंभार, प्रा. सुभाष दगडे व डॉ. रविनंद होवाळ.**

प्रा. सुभाष दगडे म्हणाले, बाबासाहेबांनी भारतातील विषमतावादी समाजरचनेचा सर्वंकष अभ्यास करून त्यावर उपाय म्हणून सामाजिक, नैसर्गिक मूल्यांवर आधारित संविधान देण्याचा प्रयत्न केला. येथे पूर्वापार वसलेल्या धर्मसंसदेपेक्षा लोकसंसद प्रभावी ठरली पाहिजे, लोकांना आवाज प्राप्त झाला पाहिजे, असा आग्रह त्यामागे होता. या पार्श्वभूमीवर बुद्धीप्रामाण्यवादी, लोकशाहीवादी दृष्टिकोन निर्माण करण्याची जबाबदारी धोरणकर्त्यांवर आहे. डॉ. रविनंद होवाळ म्हणाले, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या वाटचालीत आपण आता कुठे संविधानाच्या प्रास्ताविकेपर्यंत पोहोचलो आहोत. अद्याप बराच पल्ला आपल्याला गाठावयाचा आहे. डॉ. आंबेडकर यांनी संविधानात प्रत्येक शब्द अत्यंत अभ्यासपूर्वक व चिकित्सकपणे योजला आहे. घटना राबविणारे हात चांगले असतील, तर तिची चांगली फळे मिळतील, अन्यथा हे चांगले हात निर्माण करण्याची जबाबदारी समाजाची आहे, याची जाणीव बाबासाहेबांनी करून दिलेली होती.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने संविधान दूत ही योजना आजपासून अंमलात आणली असून त्याअंतर्गत महाविद्यालयांकडून त्यांची नियुक्ती झाल्यानंतर विद्यापीठ स्तरावर संविधान दूतांना सविस्तर प्रशिक्षण देण्यात येईल. संविधान जागृतीसाठी करावयाच्या उपक्रमांचे धोरण आखून त्यानुसार प्रत्येक संबंधित घटकापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यात येईल. विधी सेवा प्राधिकरणाचा ब्रँड अम्बॅसिडर असलेल्या पाच वर्षांच्या रेहान शकील नदाफ या बालकाने भारतरत्न डॉ. आंबेडकर यांचा जीवनपट उपस्थितांसमोर उलगडला. डॉ. आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. तेजपाल मोरे यांनी आभार मानले.


28 NOV 2017 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संविधानाबाबत जागृती आवश्यक

## शिवाजी विद्यापीठातील परिसंवादात मान्यवरांचा सूर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतीय संविधानाविषयी नागरिकांत जास्तीत जास्त जागृती करण्याची गरज असून संविधानाचा नियमित अभ्यासक्रमात समावेश करणे आवश्यक आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठात आज झालेल्या परिसंवादात व्यक्त झाला.



**कोल्हापूर : 'भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर परिसंवादात बोलताना डॉ. राजेंद्र कुंभार. यावेळी व्यासपीठावर डॉ. रविनंद होवाळ, सुभाष दगडे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आदी.**

भारतीय संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. राजेंद्र कुंभार म्हणाले, भारतरत्न डॉ. आंबेडकरांच्या क्रांतीचे चक्र अर्धेच फिरले आहे. कारण भारताचा हा अर्धा प्रवास एक व्यक्ती, एक मत इतकाच झाला आहे. अद्याप एक मत, एक मूल्य हा प्रवास पूर्ण करून क्रांतीच्या चक्रास पूर्णत्व प्रदान करावयाचे आहे. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने संविधान दूत ही योजना आजपासून अंमलात आणली असून त्याअंतर्गत महाविद्यालयांकडून त्यांची नियुक्ती झाल्यानंतर विद्यापीठ स्तरावर संविधान दूतांना प्रशिक्षण देण्यात येईल. सुभाष दगडे यांनीही मार्गदर्शन केले. केंद्र संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी स्वागत केले. तेजपाल मोरे यांनी आभार मानले.